# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 03.07.2024** **वार – बुधवार**

---

**झिका**

पुणे शहरातील डहाणूकर कॉलनीमध्ये झिका विषाणूचा संसर्ग झालेला सातवा रुग्ण आढळला. ४५ वर्षीय महिलेला झिका विषाणूचा संसर्ग झाल्याचा अहवाल प्रयोगशाळेनं दिला असून तिला सौम्य लक्षणे आहेत. यापूर्वी निदान झालेल्या सात रुग्णांमध्ये पाच महिला असून दोन पुरुष आहेत. पाच महिलांपैकी दोन गर्भवती असल्याची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे देण्यात आली.

**कचरा**

श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम महाराज यांची पालखी पुणे शहरातून मार्गस्थ झाल्यानंतर मुक्काम असलेल्या सर्व शाळा, धर्मशाळा, मंदिरं आणि पालखी मार्गावर पुणे महापालिकेतर्फे विशेष स्वच्छता मोहीम राबवली. यातून गोळा झालेल्या २५६ टन कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीनं विल्हेवाट लावण्यात आली अशी माहिती महापालिकेच्या घनकचरा विभागाचे प्रमुख संदीप कदम यांनी दिली.

**रस्ता**

कात्रज-कोंढवा रस्त्यासाठी चार लाख चौरस फूट जागेचं भूसंपादन केलं जाणार असून राज्य सरकारनं दिलेला 140 कोटींचा निधी यासाठी वापरला जाईल अशी माहिती पुणे महापालिकेच्या पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी दिली. 2018 मध्ये या कामाला सुरुवात झाली होती मात्र भूसंपादनाअभावी हे काम रखडलं होतं.

**सीताराम**

संशोधनासाठी पोषक वातावरण निर्मिती करण्याची गरज आहे. तेव्हाच विकसित भारत ही संकल्पना साकारण्यास मदत होऊ शकेल असं प्रतिपादन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष प्राध्यापक टी. जी. सीताराम यांनी आज पुण्यात केलं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२४ व्या पदवी प्रदान समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. एका विशेषांकाचं यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आलं.

**निविष्ठा**

खरीप हंगामात पुणे जिल्हा कृषी सेवा केंद्रानं केलेल्या तपासणीत गंभीर अनियमितता आढळलेल्या दहा बी-बियाणं, खतं, किटकनाशकं वितरकांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत अशी माहिती जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली. जिल्हयात निविष्ठांची गुणवत्ता राखण्यासाठी १५ भरारी पथकं कार्यरत आहेत. बोगस बियाणे विक्री करणाऱ्या दुकानदारांवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी आज जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीत दिले.

**कुष्ठरोग**

राज्यात गेल्या आर्थिक वर्षात २० हजार कुष्ठरुग्ण आढळले आहेत. त्यामुळं कुष्ठरोग निर्मूलनाच्या उद्दिष्टापासून राज्य अजूनही खूप दूर असल्याचं चित्र समोर आलं आहे म्हणून राज्यातील कुष्ठरुग्ण शोधण्यासाठी सातत्यानं मोहीम राबविली जात असल्याचं राज्य कुष्ठरोग विभागाचे सहसंचालक डॉक्टर संदीप सांगळे यांनी सांगितलं.

**आई**

पिंपरी चिंचवड महापालिका शासकीय दस्तावेजांवर उमेदवाराच्या नावापुढं आईचं नाव लिहिणं बंधनकारक करणार असून त्याबाबतचे निर्देश सर्व विभागप्रमुखांना देण्यात आले आहेत. यावर्षी १ मे नंतर जन्माला आलेल्या व्यक्तींना हा निर्णय लागू असणार आहे.

**आपत्ती**

पिंपरी चिंचवड महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या वतीनं संभाव्य आपत्ती प्रवण स्थळांच्या ठिकाणी तत्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या ठिकाणी २४ तास आपत्कालीन प्रतिसाद पथक तैनात असेल अशी माहिती पालिका सह-आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी दिली.

**वृविक्रेते**

वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या घोषणेचं पुणे वृत्तपत्र संघाचे सभासद राम दहाड यांनी स्वागत केलं आहे. दहाड यांनी सर्व जिल्ह्यातील सर्व वृत्तपत्र विक्रेत्यांच्या सूचना लक्षात घेण्याची विनंती मुख्यमंत्र्यांना केली आहे.

**भुशी**

लोणावळा इथल्या भुशी धरणाच्या पाण्यात बुडून एकाच कुटुंबातील ५ जणांचा मृत्यू झाल्यानंतर या परिसरातील किमान ७० अनधिकृत स्टॉल नगरपरिषदेनं काढून टाकले आहेत. आता मावळ, मुळशी, वेल्हे तालुक्यातील घाटांमधील अनधिकृत टपरीधारकांवरही कारवाई सुरु केली जाणार आहे.

**प्रमुख**

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सध्याचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक संजय कोलते यांची बदली झाली असून त्यांच्या जागी आशिष येरेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**पुरस्कार**

पुण्यातील शेठ चिमणलाल गोविंददास मेमोरिअल ट्रस्टतर्फे यावर्षीच्या उद्यमगौरव आणि सेवागौरव पुरस्कारांची घोषणा आज करण्यात आली. यंदा या पुरस्कारांचे २६ वं वर्ष आहे. ७ जुलै रोजी पुण्यात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**